महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००३.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
NASHIK DIVISIONAL BOARD ,NASHIK – 422 003

गट/सर्वे नं.१५६०/१ आडगांवशिवार, न्यूइंग्लिशस्कूलजवळ, मुंबईआग्रारोड, आडगांव, नाशिक
Website : www.sscboardnashik.com Telephone : 0253 2945241, 2945251 Email : nsksec@rediffmail.com


क्र. नाविमं/लेखा/परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/३०९
नाशिक – ४२२ ००३
दिनांक :– १८/०४/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
मंडळ मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा व
कनिष्ठ महाविद्यालये,
नाशिक, धुळे व जळगाव जिल्हा

विषय :– अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील इ.१०वी व इ.१२वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत...

संदर्भ :– १. शासन निर्णय क्र.सीएलएस.२०२५/प्र.क्र.३६५/म.३(मदत–१), दि.१०/१०/२०२५
२. शासन निर्णय क्र.सीएलएस.२०२५/प्र.क्र.३६५/म.३, दि.०९/१०/२०२५
३. शासन निर्णय क्र.संकिर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी–५, दि.०१/०८/२०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकिर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी–५, दि.०३/०२/२०२०
५. शा. निर्णय क्र. एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि–५, दि.१८/१०/१९९३
६. क्र. रा.मं./लेखा/अवर्षणग्रस्त फी माफी–प्रतिपूर्ती २५–२६/१६७९, दि.१७/०४/२०२६ रोजीचे राज्य मंडळ कार्यालयाचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, अतिवृष्टी व पूर आपत्तीमुळे ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित तालुक्यातील फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त (इ.१०वी) व उच्च माध्यमिक (इ.१२वी) प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या इ.१०वी व इ.१२वीच्या नियमित विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी/फी ची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने खालील सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. संदर्भिय क्र. ३ व ४ च्या शासन निर्णयानुसार अवर्षणग्रस्त भागातील इ.१० वी व इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांच्या आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती राज्यमंडळ स्तरावरुन नियमित विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आधार संलग्न Bank Account मध्ये NEFT/RTGS व्दारे करण्यात येणार आहे.

२. सन २०२५–२६ मध्ये २९ जिल्ह्यातील ३१ अंशतः बाधित व २५१ पूर्णतः बाधित असे एकूण २८२ तालुक्यातील इ.१०वी व इ.१२वी च्या या योजनेस पात्र असलेल्या नियमित विद्यार्थ्यांना आकारण्यात आलेल्या संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करावयाची आहे.

३. राज्य मंडळाने 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६' मधील प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी साठी मंडळाच्या संकेतस्थळावर शाळा महाविद्यालयांनी आपल्या लॉगइन–पासवर्ड चा उपयोग करुन लॉगइन करावे. अतिवृष्टी व पूर आपत्तीग्रस्त विद्यार्थ्यांची माहिती भरण्यासाठी Option तेथे उपलब्ध होईल. सदर माहिती भरण्याकरीता **सोमवार, दिनांक २०/०४/२०२६ ते शनिवार दिनांक ०२/०५/२०२६** हा कालावधी देण्यात येत आहे.

४. राज्यमंडळाने उपलब्ध केलेल्या माहितीमध्ये नियमित विद्यार्थ्याचा बैठक क्रमांक, विद्यार्थ्यांचे नाव, बॅंक खाते क्रमांक, बॅंक आय एफ एस सी कोड, आधार क्रमांक अशी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

५. राज्यमंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या पुढेच पात्र (Qualified) रकाना उपलब्ध केला असून त्यामध्ये (Qualified) असा शेरा संबंधित माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांनी नोंद करावयाचा आहे.

६. पात्र विद्यार्थी निश्चित करताना संदर्भिय क्र. ३ व ५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद पात्रता निकष आणि सन २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या अंशत: बाधित/पूर्णत: बाधित तालुक्यांची यादी विचारात घ्यावी. सदर शासन निर्णय उपरोक्त लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

७. अंशत: बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळांनाच ही योजना लागू आहे. त्यामुळे अंशत: बाधित तालुक्यातील प्रत्यक्ष बाधित मंडळामधील विद्यार्थ्यांचीच माहिती भरावी.

८. पात्र नियमित लाभार्थ्यांना उपरोक्त संदर्भिय क्र. ३ व ४ च्या शासन निर्णयानुसार राज्य मंडळ स्तरावरुन शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा NEFT/RTGS व्दारे विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या आवेदनपत्रामध्ये नमूद केलेल्या आधार संलग्न खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.

तेव्हा उपरोक्त सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी तसेच कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

18/4

( डॉ. एम. व्ही. कदम )
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३.

**प्रत माहितीस्तव :—**

मा. सचिव, राज्य मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे — ४११ ००४.

**प्रत माहितीस्तव तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :—**

१. मा. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), नाशिक, धुळे व जळगाव जिल्हे

यांना कळविण्यात येते की, मंडळाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ भरणेबाबत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

| शा. नि., क्रमांक:- सीएलएस-२०२५ /प्र.क्र.३६५ /म-३ (मदत-१),दिनांक:- १० ऑक्टोबर, २०२५ सोबतचे परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | अंशत: बाधित तालुके* | पूर्णत: बाधित तालुके | बाधित तालुक्यांची संख्या |
| १ | पालघर | - | पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड | ४ |
| २ | नाशिक | कळवण, देवळा, इगतपुरी | मालेगाव, निफाड,नांदगाव,सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला | १५ |
| ३ | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा | - | ३ |
| ४ | जळगांव | - | एरंडोल , पारोळा, धरणगाव ,पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव , अमळनेर ,रावेर, चाळीसगाव,भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर | १३ |
| ५ | अहिल्यानगर | पारनेर, संगमनेर, अकोले | अहिल्यानगर,शेवगाव, कर्जत,पाथर्डी, नेवासा , राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा ,कोपरगाव | १४ |
| ६ | पुणे | हवेली, इंदापूर | - | २ |
| ७ | सोलापूर | - | उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा , सांगोला | ११ |
| ८ | सांगली | कडेगाव | मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव , कवठेमहाकाळ, विटा, आटपाडी, जत | १० |
| ९ | सातारा | सातारा,कराड, पाटण, फलटण, जावळी | कोरेगाव, खटाव, माण | ८ |
| १० | कोल्हापूर | कागल ,शिरोळ, पन्हाळा | करवीर ,राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड | ८ |
| ११ | छ. संभाजीनगर | - | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर,गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड,फुलंब्री | ९ |
| १२ | जालना | - | बदनापूर ,घनसावंगी, अंबड , जालना ,परतूर,मंठा , भोकरदन, जाफ्राबाद | ८ |
| १३ | बीड | - | बीड ,गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई ,परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी | ११ |
| १४ | लातूर | - | लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर | १० |
| १५ | धाराशिव | - | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर,लोहारा,परांडा ,उमरगा | ८ |